# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५६ वा ❑ शनिवार दि.०६ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## संचार साथी किती सुरक्षित?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

सरकारने डिजिटल सुरक्षेच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. दूरसंचार विभागाने देशात उत्पादित आणि परदेशातून आयात केलेल्या सर्व मोबाइल फोनवर ''संचार साथी ॲप'' प्री-इंस्टॉल करणे अनिवार्य केले आहे.सरकारच्या या निर्णयामुळे मोबाईल द्वारे होणारी फसवणूक व सुरक्षे साठी ॲप डाउनलोड करण्याचे निर्देश देण्यात आले असले तरी या ॲपमुळे गोपनियतेचा प्रश्न देखील निर्माण होणार आहे.

संचार साथी हे ॲप डाऊन लोड केल्यानंतर कोणत्याही स्मार्टफोनमधून डिलीट करता येणार नाही. दूरसंचार विभागाने सर्व मोबाइल कंपन्या आणि आयातदारांनाही आदेश जारी केले आहेत. केंद्र सरकारचा हा नियम ॲपल, सॅमसंग ओपो शाओमी आणि विवो यासह सर्व मोबाइल कंपन्यांना लागू होईल. जे फोन आधीच बाजारात विक्रीला आहे त्यांच्यामध्येही सॉफ्टवेअर अपडेट द्वारे ॲप देणे बंधनकारक करण्यात आले आहे या आदेशाची कंपन्यांना पुढील ९० दिवसात अंमलबजावणी करावी लागेल.

संचार साथी ॲपबाबतच्या नवीन सरकारी आदेशामुळे वाद निर्माण झाला आहे. विरोधकांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत आणि या निर्णयाला असंवैधानिक म्हटले आहे. त्यांनी असा दावा केला आहे की सरकार लोकांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी याचा वापर करत आहे. त्यांनी या ॲपची तुलना इस्रायली स्पायवेअर ॲप पेगाससशीही केली आहे. हे लक्षात घ्यावे की केंद्र सरकारने यापूर्वी सर्व नवीन मोबाइल हँडसेटवर संचार साथी ॲप अनिवार्य केले होते.

दूरसंचार विभागाने मोबाईल हँडसेट उत्पादक आणि आयातदारांना सर्व नवीन उपकरणे ९० दिवसांच्या आत संचार साथीमध्ये प्री-इंस्टॉल केलेली असल्याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहे.

**विरोधकांकडून गंभीर आरोप**

तथापि, विरोधी पक्षांनी या निर्णयावर जोरदार टीका केली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी एका पोस्टमध्ये या निर्णयाला''पूर्णपणे असंवैधानिक'' म्हटले आहे. एका सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्टमध्ये ते म्हणाले, ''बिग ब्रदर आम्हाला पाहू शकत नाही. दूरसंचार विभागाचा हा आदेश पूर्णपणे बेकायदेशीर आहे. गोपनीयतेचा अधिकार हा संविधानाच्या कलम २१ अंतर्गत हमी दिलेल्या जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा एक आवश्यक भाग आहे.'' त्यांनी पुढे म्हटले की, प्री-लोडेड सरकारी ॲप जे अनइंस्टॉल करता येत नाही ते प्रत्येक भारतीयाचे निरीक्षण करण्यासाठी एक धोकादायक साधन आहे आणि प्रत्येक नागरिकाच्या प्रत्येक कृती, संभाषण आणि निर्णयावर लक्ष ठेवण्याचा एक मार्ग आहे. त्यांनी हा आदेश मागे घेण्याची मागणीही केली.

**सरकारचा तर्क काय आहे?**

सरकारने आपल्या निर्णयाचा बचाव करत म्हटले आहे की, डुप्लिकेट आणि बनावट नंबर रोखण्यासाठी हे पाऊल आवश्यक आहे, जे राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करू शकतात. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की भारतात सेकंड-हँड फोन मार्केट आणि चोरीला गेलेल्या किंवा काळ्या यादीत टाकलेल्या उपकरणांची पुनर्विक्री वाढत आहे. अशा परिस्थितीत, फोन ट्रेस करण्यासाठी संचार साथीसारखी विश्वासार्ह प्रणाली तयार करणे आवश्यक आहे. सरकारने म्हटले आहे की हा आदेश हेरगिरीसाठी नाही तर राष्ट्रीय सुरक्षेसाठी आहे.

**संचार साथी ॲप म्हणजे काय?**

हे ॲप २०२३ मध्ये दूरसंचार विभागाच्या सूचनेनुसार लाँच करण्यात आले. या संचार साथी ॲपच्या पोर्टलद्वारे तुम्ही हरवलेल्या मोबाईल फोनबद्दल तक्रारी नोंदवू शकता आणि ते त्वरित ब्लॉक करू शकता. तसेच तुम्हाला संशयास्पद लिंक्सची तक्रार करण्याची आणि एखाद्या व्यक्तीच्या नावावर किती सिम कार्ड सक्रिय आहेत हे शोधण्याची परवानगी मिळते.

संचार साथी ॲपने लाखो लोकांना मदत केली आहे.

हे ॲप मोबाइल वापरकर्त्यांना विविध सेवा प्रदान करेल. देशात वापरकर्त्याच्या नावावर किती कनेक्शन आहेत हे तपासणे सोपे होईल. वापरकर्त्याचा मोबाइल फोन खरा आहे की खोटा हे देखील ठरवणे शक्य होईल. स्पॅम आणि संशयास्पद कॉल्सबाबत तक्रारी देखील दाखल करता येतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जर एखाद्या व्यक्तीला परदेशातून कॉल आला तर तो त्याची तक्रार देखील करू शकतो. या ॲपचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला कोणत्याही ओटोपी पडताळणीची आवश्यकता नाही.

संचार साथी ॲप पोर्टलवरील डेटा पाहिल्यास असे दिसून येते की आतापर्यंत ४.२ दशलक्षाहून अधिक मोबाइल फोन ब्लॉक करण्यात आले आहेत. २.६ दशलक्षाहून अधिक चोरीच्या फोनची माहिती देखील मिळाली आहे. याव्यतिरिक्त, वापरकर्त्यांच्या नावावर किती कनेक्शन आहेत हे निश्चित करण्यासाठी २८.८ दशलक्षाहून अधिक तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. यापैकी २५.४ दशलक्षाहून अधिक तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. संचार साथी अँपला मोठ्या प्रमाणात रस निर्माण होत आहे. आतापर्यंत १ कोटींहून अधिक लोकांनी पोर्टलवर नोंदणी केली आहे. डाउनलोडच्या बाबतीत, ते १ कोटींहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे. ते ॲपल स्टोअरवरून ९ लाखांहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे.

या ॲपद्वारे फसवे कॉल, एसएमएस किंवा व्हॉट्सॲप मेसेजेसची तात्काळ तक्रार करू शकता येणार आहे.. बँकिंग केवायसी, वीज/गॅस, विमा, गुंतवणूक घोटाळे आणि सरकारी अधिकाऱ्याची तोतयागिरी करून फसवणुकीशी संबंधित प्रकरणांची तक्रार देखील करू शकता येणार आहे मात्र सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी येथे दाखल करता येणार नाहीत; यासाठी .. पोर्टलला भेट द्यावी लागणार आहे.

# मानवाची आध्यात्मिक भूक भागविण्यासाठी वेद, गीतेकडे परतण्याची गरज–राज्यपाल आचार्य देवव्रत

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** समरसता, बंधुभाव, एकता राखणे ही वेदांची शिकवण असून संघटन ही एक ताकद असल्याचा वेदांचा उपदेश आपल्या जीवनात अंगीकारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. मानवाची आध्यात्मिक भूक भागविण्यासाठी आपल्याला वेद, गीता, उपनिषदांकडे पुन्हा जावे लागेल, असेही ते यावेळी म्हणाले.

वेदश्री तपोवन, मोशी येथे वेदश्री तपोवन कार्य समिती, महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान, संत ज्ञानेश्वर गुरुकुल, गीता परिवार, श्री कृष्ण सेवा निधी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गीता जयंती महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी शांतीब्रम्ह ह. भ. प. मारुती महाराज कुरेकर यांना संत ज्ञानेश्वर पुरस्कार, श्री चिलकूर बालाजी वेंकटेश्वर स्वामी मंदिर, हैदराबादचे अर्चक व विश्वस्त सी. एस. रंगनाथन यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार तसेच संत साहित्य अभ्यासक डॉ. मुकुंद दातार यांना समाज सेवा क्षेत्रात निरपेक्ष भावनेने काम केल्याबद्दल मानचिन्ह, पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी अयोध्या येथील श्रीराम मंदिर तीर्थक्षेत्र प्रतिष्ठान अयोध्याचे कोषाध्यक्ष तथा श्रीकृष्ण जन्मभूमी मथुराचे उपाध्यक्ष गोविंद गिरी महाराज, गीता जयंती महोत्सवाचे स्वागताध्यक्ष अभय सुरेशकुमार भुतडा, गीता परिवाराचे कार्याध्यक्ष संजय मालपाणी आदी उपस्थित होते.

स्वामी गोविंद गिरी यांनी वेदांपासून उपनिषदांपर्यंत भारतीय ऋषी मुनींचे ज्ञान येणाऱ्या पिढ्यांच्या माध्यमातून संपूर्ण मानवतेसाठी प्रसारित करण्याची चालविलेली मोहीम महत्वपूर्ण असल्याचे सांगून राज्यपाल देवव्रत म्हणाले, गीता परिवार, तपोवन वेदश्री तसेच देशभरात सुमारे ५० वेद विद्यालयाच्या, गुरुकुलांच्या माध्यमातून गोविंदगिरी महाराज करत असलेले वेद, गीता शिक्षणाचे काम अत्यंत अभिमानाचे आहे. गोविंद गिरी यांनी वेदांची महती पुनरुज्जीवत करण्याचे काम केले. वेद केवळ भारत आणि भारतीयांचाच नव्हे तर विश्वाचा महान वारसा आहे. वेदांचा सार उपनिषदे असून उपनिषदांचा सार गीता आहे, असेही ते म्हणाले.

राज्यपाल पुढे म्हणाले, महाराष्ट्र ही संत महात्म्यांची भूमी राहिली असून छत्रपती शिवाजी महाराज यांनी भारतीय जीवनमूल्यांच्या स्थापनेसाठी मोठे अभियान चालविले तसेच सर्वांना प्रेरित केले. कुरुक्षेत्रावर भगवान कृष्णांनी अर्जुनाच्या माध्यमातून जगाला संस्कृत भाषेत सांगितली. संपूर्ण समाजाने अध्यात्मिक, सामाजिक, भौतिक जीवन कसे जगले पाहिजे याचे मार्गदर्शन गीतेने केले. ही गीता संत ज्ञानेश्वर यांनी प्राकृत भाषेत पोहोचवली. हे ज्ञान हजारो बालकांपर्यंत पोहोचवण्याचे काम कुरेकर महाराज यांनी केले तसेच चिलकूर बालाजी मंदिराचे दरवाजे सर्वांना प्रवेश मिळावा यासाठी काम केल्याबद्दल सी. रंगनाथन यांचे अभिनंदन केले.

आचार्य देवव्रत यांनी पुढे नमूद केले, पाच हजार वर्षांपूर्वीपासून गीतेचे ज्ञान मानवतेचे अध्यात्म, कर्म, योग, भक्ती आदी क्षेत्रात मार्गदर्शन करत असून मानवाच्या जीवनातील कोणताही अडथळा, दु:खाचे निवारण नाही ज्यावर गीतेमध्ये उपाय नाही. हा आपल्या



भारतीय संस्कृतीचा वारसा जो वेदांतून प्रवाहित झाला, उपनिषदातून वाढला आणि गीतेतून प्रवाहित झाला. आज युवकांना गीतेचे ज्ञान दिल्यास ते भोगवादापासून, व्यसनांपासून दूर राहतील, असेही मत त्यांनी मांडले.

ते पुढे म्हणाले, एका काळी जगातील सर्व देशातील विद्यार्थी भारतातील गुरुकुलातील आचार्यांकडून शिक्षण घेत होते. येथे जगात मोठ्या प्रमाणात व्यापार होत असल्याने देश समृद्ध होता. आज आपल्या भाषा, संस्कृतीवर अभिमान करत नसताना आपली वेश भूषा आणि खान पान गुलामीच्या काळाप्रमाणे प्रभावित झालेली असताना आज पुन्हा गोविंद गिरी ह. भ.प. कुरेकर, सी. रंगराजन यांच्यासारख्या व्यक्ती भारतीय संस्कृतीचा गौरव वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहेत, असेही ते म्हणाले.

गोविंद गिरी म्हणाले, संत ज्ञानेश्वरांनी गीतेला प्राकृत भाषेत भाषांतरीत करून सामान्यांपर्यंत गीतेचे ज्ञान पोहोचवण्याचे काम केले. त्यांनी आळंदीतून हे काम केल्यामुळे गीता जयंती महोत्सव आणि गीतेचा मराठी भाषेत अभ्यास खऱ्या अर्थाने या ठिकाणी करणे योग्य आहे. देशातील सर्व घटकांना गीतेने मार्गदर्शन केले आहे. क्रांतीकारकांनीही गीतेचा प्रचार व अभ्यास केला, असेही ते म्हणाले. यावेळी ह. भ. प. कुरेकर तसेच रंगनाथन यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी श्लोकांची अंताक्षरी, गीतेतील श्लोकांकावरून श्लोकाचे गायन आदींचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. वेद विद्यालय, गुरुकुल, वारकरी विद्यालय आदी ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या आणि गीता अभ्यासाच्या अनुषंगाने आयोजित विविध स्पर्धात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना याप्रसंगी पुरस्कार देण्यात आले.

तत्पूर्वी राज्यपालांनी वेदश्री तपोवन येथील वेद विद्यालयाला भेट दिली. या ठिकाणी वेदाचे अध्यापन करण्यात येते. येथे वेद, उपनिषदे आदींच्या अभ्यासासाठी सुसज्ज ग्रंथालय असून ई- लायब्ररी आहे. प्राचीन ग्रंथ स्कॅन करून ठेवण्याचे काम येथे सुरू आहे, अशी माहिती यावेळी राज्यपालांना देण्यात आली.








## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-१०९

या लघुलेखात आपण 'करड्या' रंगाची माहिती घेऊया...!! काळा आणि पांढरा या दोन रंगांपासून 'करडा रंग' निर्माण होतो. यालाच 'ग्रे' असंही म्हणतात. ह्या करड्या वा ग्रे ला समतोल राखणारा रंगही म्हणतात किंवा तटस्थ रंग असंही म्हणतात. हा रंग खूप कमी लोकांना आवडतो. तथापि हा रंग आवडणारी व्यक्तीमत्वे ही देखील फार वेगळ्या प्रकृतीची असतात.

कुठल्याही रंगाचा समतोल राखायचा असेल तर 'ग्रे'चा फार उपयोग होतो. त्यामुळे या रंगाला चित्र संकल्पना मध्ये अनन्य साधारण महत्व आहे.

ह्या रंगाला ज्ञान, बुध्दी आणि करारी पणाचा कारक मानतात. या रंगाला नवरात्री मध्ये विशेष महत्व असते. कांही संस्कृतीत हा रंग शुभ मानला जातो. तो सर्व अडथळे दूर करणारा आणि दुष्टांचा नाश करणारा, म्हणूनही मानला जातो. घटस्थापनेच्या सातव्या दिवसाची माळ, राखाडी किंवा ग्रे रंगाची असते.

ढगांचा रंग करडा किंवा 'ग्रे'च्या छटांनी बनलेला असतो. वृद्धापकाळ जवळ आल्यानंतर डोक्यावरील केस, या रंगाच्या जवळ जाणारे असतात. वृद्ध ही प्रकृती "ज्ञानाशी" संबंधित असल्याने "ग्रे" रंग हा निवृत्तीचं प्रतीक म्हणूनही मानला जातो. करडा रंग जसा शांतता आणि स्थिरता दर्शवतो, तसाच विविधीकृत गुंतवणूक आणि तुमच्या पैशाला सुरक्षितता आणि स्थैर्य देतो.

"वास्तुशास्त्र पेंटींग " मध्ये संपूर्ण पेंटींग मधील रंगांचं संतुलन, टिकवून ठेवण्यासाठी दुसर्या रंगाची योजना केली जाते. मुख्य म्हणजे या रंगाला रंगचक्रातील कुठल्याही रंगा बरोबर घेतले तरी बॅलन्स साधला जातो. वास्तविक करडा हा रंग, इतर रंगांच्या तुलनेने फारच निस्तेज भासतो परंतु इतर कुठल्याही रंगा बरोबर करडा आला की त्या त्या रंगाच्या तेजस्वितेत अधिक भरच पडते...!! हा रंग विश्वास, प्रगल्भता आणि स्थित:प्रज्ञ असतो. या रंगाच्या कपड्यामध्ये व्यक्तीमत्व खुलून दिसते. खूपदा "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये भडक रंग, "फ्लोरोसंट" म्हणजे चमकणारे रंग आपण वापरत नाही मात्र जिथे ग्रे किंवा करडा रंग इतर रंगाजवळ आलेला किंवा आणलेला दिसतो, तेथील रंग हे अधिक तेजस्वी किंवा प्रभावी दिसतात.

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

माहेरा जाऊन
नको बसू नकात,
नांदाव सासरी,
अस राहाव झोकात ||३८१||

सदा माहेरा जाऊन
नको घालवू किंमत
कळण्याकोंड्याची
आपली भाकर श्रीमंत ||३८२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## माती भिडली आभाळा...




ज्योतिर्मय साहित्य

गारंबीचा बापू या चित्रपटात शांता शेळके यांचं एक सुरेख आणि अर्थपूर्ण गाणं आहे. अजब सोहळा, माती भिडली आभाळा...

रवींद्र साठे यांनी असं काही भावपूर्ण आवाजात गायिलं आहे की मला हे गीत नेहमी गूढ, गंभीर आणि रहस्यमय वाटत आलं आहे. पण त्यातील अर्थ जाणवावा, त्याचा प्रत्यय यावा असाच काहीसा अनुभव परवाच्या दिवशी आला. मी पुण्याहून गावाकडे परत येत असताना नगर-औरंगाबाद रस्त्यावर नेवासे फाटा लागतो. अनेकदा येताना जाताना या गावावरून गेलो आहे. पण परवा सहज मनात आलं की हेच ते नेवासा ना जिथे ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिली ? आपण कधी गेलो का तिथे ? मग ठरवलंच की परत जायला कितीही वेळ होवो, आज आपण तिथे जायचंच आणि त्या पवित्र ठिकाणाचं दर्शन घ्यायचं.




मुख्य रस्त्यापासून आणि नेवासे फाट्यापासून नेवासे गाव साधारणपणे पाच किमी आत आहे. जाताना मध्ये थोडाफार कच्चा रस्ता लागतो. पण माऊलींचं दर्शन घ्यायचं एकदा मनानं घेतलं की रस्ता कच्चा असो की चांगला, सहज पार होतो. गावात शिरता शिरता एकाला विचारलं, माऊली ? एवढा एकच शब्द पुरेसा होता. त्याने लगेच मंदिराच्या दिशेकडे बोट दाखवलं. माऊली म्हटलं की झालं. कोण माऊली असा प्रश्न पडत नाही एवढी थोरवी त्या एकाच माऊलीची. मंदिराकडे जाताना सुंदर हिरवीगार शेतं मन आकर्षून घेत होती. माऊलींच्या मंदिरासमोरचा परिसर निसर्गरम्य, शांत आणि प्रसन्न भासत होता. मंदिरासमोर चिंचा लगडलेली छान चिंचेची झाडं. झाडाखालीच एक माऊली हार आणि प्रसाद विक्रीसाठी घेऊन बसलेली. तिच्याकडून दोन हार आणि प्रसाद घेतला. कमानीतून मंदिराच्या आवारात प्रवेश केला. मंदिराचे आवार प्रशस्त, शांत, स्वच्छ अन प्रसन्न.

थोड्याशा पायऱ्या चढून मंदिरात पोहोचलो तो भव्य सभामंडप दिसला. पाहतो तो त्यात पंचवीस तीस स्त्री पुरुष ज्ञानेश्वरीचं पारायण करतानाचे सूर कानी आले. त्यामुळे मंदिराचं वातावरण आणखीनच प्रसन्न वाटत होतं . ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायातील ओव्या कानावर पडत होत्या.

उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे ।
हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा ।।
ना तरी उदो अस्तु आपैसे । अखंडित होत जात जैसें ।
हें जन्ममरण तैसें । अनिवार जगीं ।।

जे जे उपजते किंवा जन्म घेते ते ते नाश पावते. नाश पावलेले पुन्हा दुसऱ्या रूपाने प्रत्ययास येते. सूर्य आणि चंद्राचा उदय अस्त हे अखंडित सुरूच असतात. त्याचप्रमाणे जन्ममरणाचे हे चक्र अविरत सुरु राहते. तेव्हा एखाद्या व्यक्ती किंवा वस्तूबद्दल आसक्ती मनात धरणे आणि तिच्या नष्ट होण्याने शोक करणे व्यर्थ आहे. या अर्थाच्या या सुंदर ओव्या कानी पडल्या. ज्या ठिकाणी साक्षात माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितली, त्याच ठिकाणी तिचे मनन, पठण किंवा पारायण करणारी ही मंडळी किती भाग्यवान आहेत असा विचार मनात आला. **(क्रमशः)**





## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सगुणभजन

ज्योतिर्मय साहित्य

दशक ६, समास ७

नमस्कार

आठ दिवसाच्या गँप नंतर आज ‘‘दासबोध‘‘निरूपण लिहायला घेतले. दररोज आपले काही तरी चुकत आहे याची सतत जाणीव होत होती पण समर्थांनी सांगितले आहे की ‘‘आधी प्रपंच करावा नेटका‘‘ या वाक्याने अंगात शक्ति येत होती गणपती गौरीच्या आगमनाची तयारी व सण यामुळे लिहायला विलंब झाला सर्वाची क्षमा मागते व सगुणभजनया समासाच्या समारोपाकडे येते. आपण आता पर्यन्त अभ्यासलो आहोत की मी कर्ता असे कधीही म्हणू नये. माझ्या हातून जे जे कर्म झाले ते ते ईश्वरेच्छा होती, परमात्म्याने माझ्या कडून ते कार्य करून घेतले असे मानले पाहिजे. नाही तर समाजातील काही लोक.स्वतः कडे असे कर्तेपण घेतात की चंद्र सुर्य पण माझ्या सांगण्या वरून प्रगट होतात व मावळतात. असे बढाईखोर लोकांच्या बुध्दीची कीवकरावीशी वाटते. असे बाता मारणारे लोक आपण आजुबाजुला पहातो.

सगुणभजन या समासात समर्थांनी असे सांगितले आहे की ‘‘ईश्वर कर्ता आहे‘‘ या भावनेने वागले तर भगवंत आपल्याला आशिर्वाद देतो.

भगवंत शाश्वत आहे त्याच्या पेक्षा आपले जीवन किती अल्प आहे. भगवंताची महती किती मोठी त्या मानाने मी किती लहान आहे याची जाणीव ठेवावी. कितीही मोठे झाले तरी उपासना सोडू नये. मी तर असेही वाचले आहे की भारतरत्न सचिन तेंडुलकर व त्याचे कुटुंबातील सदस्य मनाचे श्लोक म्हणतात. म्हणजेच सर्वोच्च स्थानात पोहचला तरी आपल्या गुरूंना विसरू नये. खरें म्हणजे उपासनेने दृश्याचें मिथ्यापण लक्षात येते आणि आपली देहबुद्धी संपते. ती संपू नये म्हणून देहाला उपासना लावावी आणि विवेकाने ‘‘मी ‘‘पणा मारावा किंबहुना तो संपवून अध्यात्माची कास धराली की खरे आत्मज्ञान उदय पावते. शेवटच्या पाच ओव्यात समर्थ काय उपदेश करतात ते आता पाहूयात. या प्रचंड विश्वामध्ये भगवंत सर्व व्यापी आहे. भगवंताच्या शक्तिने आपण कार्य करतो,जगतो कर्म करतो आपल्या वाट्याला आलेले चांगले वाईट भोग भोगतो आपली नितीमत्ता चांगली असेल तर वाईट परिस्थिती आली तरी त्याच्यावर मात करून चांगले ध्येय गाठतो. कारण सगुणोपासना आधी चांगली केली असल्याने वाईट परिस्थिती निर्माण झाली तरी तो डगमगत नाही.आपली ऊच्चध्येयमुल्ये सोडत नाही. म्हणून सततची उपासना हवीच. ‘‘मी ज्ञानी आहे‘‘अशा मोठेपणाची भावना ठेऊन कोणी ईश्वराच्या उपासनेला तुच्छ लेखत असेल तर त्याचा परिणाम त्याला भोगावा लागेल. ते ज्याचे त्याने पाहुन घ्यावे. देह सगुणाच्या उपासनेत गुंतलेला ठेवायचा, ‘‘मी‘‘पणा विवेकाने नाहीसा करायचा. सत्पुरूषाच्या जीवनात अशी ही आत बाहेर अवस्था असते. देहाने भगवंताचे भजनपूजन आणि मनाने स्वस्वरूपाशी अनुसंधान हा तर संतजीवनाचा मुळ गाभा आहे. तो जर तुमचा पक्का असेल तर ‘‘समाधी साधन संजीवन नाम‘‘साधण्यास वेळ लागणार नाही. मात्र त्यासाठी एक मात्र खरे लक्षात ठेवले पाहिजे आपलेच आचारविचार, वाणी, यावर नियंत्रण असणे गरजेचे आहे. भगवंताच्या उपासनेने सगुणोपासना जपावी वाढवावी आपल्या व्यवहारी जगात आमलात आणावी.

श्री,राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ
समास ७वा समाप्त

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संतांचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




ज्योतिर्मय साहित्य

काल माऊलींच्या चरणी नांदेडच्या एका भक्ताने एक कोटी रूपयांचा रत्नजडीत मुकूट अर्पण केला त्या माउलींना एके काळी दोन वेळचा घास मिळत नव्हता रहायला आसरा नव्हता. संन्यासाची लेकरे म्हणून सतत हेटाळणी सहन करावी लागली अशा

श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली, माऊलींच्या जीवनपटा विषयी

मित्रांनो आपल्या मृत्यूचा सोहळा साजरा करणारा हा देवांचा देव ज्ञानोबाचं करू शकतो. कारण आपण सर्व सामान्य माणसं माणसं मृत्युचं नाव जरी काढलं तर अंगावर काटा येतो.

माझ्या नंतर माझ्या घरादाराचं काय होईल?

माझी मुलंबाळं व्यवस्थित रहातील का?असे एक ना अनेक प्रश्न तुमच्या माझ्या सारख्या सर्व सामान्यांना पडतील?

पण विश्वाचे आर्त मनामध्ये ठसवणाऱ्या पसायदानाने लहानपणापासून हरिपाठ विठ्ठल भक्ति व विचारांच्या सानिध्यात लहानाचे मोठे झालेल्या माउलीला मृत्यूचें भय कसले ? म्हणून कसलेही भय न बाळगता एक तरी ओवी अनुभवावी. हा संदेश माऊली देतात.

कापुराची वाती उजळली ज्योति ।
ठायींच समाप्ति झाली जैशी ।

आपल्या कर्तृत्व, श्रेष्ठत्व,व दातृत्व भारतीय संस्कृती व साहित्य सर्वदूर पोहचवणारी माऊलींच्या कार्यकाळा विषयी या लेखात थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करते.

ज्ञानराज माऊली बद्दल थोडक्यात लिहिणे म्हणजे. मला माऊली काहीचं समजले नाही असे वाटते. कारण अशा थोर विभूती महात्म्यांचा अभ्यास एका जन्मात होणे शक्य नाही. तरी हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

पैठण जवळील आपेगावात गोदावरीच्या काठावर ज्ञानेश्वरांचे पूर्वज हरिहरपंत रहात होते. त्यांचा चार नंबरचा मुलगा त्र्यंबक त्यांनी संन्यास घेतला होता. त्र्यंबकपंतांच्या मुलांचे नाव गोविंदपंत. गोविंदपंतांचा विवाह देवकुळे कुलातील निराबाई या अत्यंत सात्विक, सोज्वळ कन्येशी झाला. त्याकाळच्या कालमाना प्रमाणे अत्यंत साधी रहाणी पण संपूर्ण कुटुंबाला आधार देणारी स्त्रि पतिनिष्ठा प्राणापलीकडे जपणारी भारतीय स्त्रियांचे मुर्तिमंत उदाहरण म्हणून निराबाई कडे पाहिले जाते.

खाण तशी माती या मातीचा सुगंध आज माऊलींच्या रूपाने आपण अनुभवत आहोत म्हणून

घराघरात ज्ञानेश्वर जन्माला यावेत. एकतरी ओवी अनुभवावी, पुढे त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले, त्यांचे नाव विठ्ठल ठेवण्यात आले.

विठ्ठलाचे मौजिबंधन झाल्यावर त्यांनी शास्त्राभ्यास सुरू केला. अतिशय विद्वान ब्राह्मण म्हणून पैठणच्या विद्वत सभेत विठ्ठल पंत सर्वमान्य होते.

आपण जन्म कुणाच्या पोटी घ्यावा हे आपल्या हातात नसते पण विठ्ठलपंत जन्माने व कर्माने पण ब्राह्मण होते. यच्चंयावत विद्वत्ता त्यांच्या नसानसांत होती.

अठरा पुराणे साही शास्त्र वेदविद्या त्यांना मुखोद्गत होती. आपल्या ज्ञानात भर पडावी म्हणून ते तिर्थाटन करत करत म्हणजे सोरटी सोमनाथ, काशी, गया मुचकुंद गुंफा धवलपूर करत करत ते त्र्यंबकेश्वर नाशिक येथे आले. पुढे भिमाशंरचे दर्शन घेऊन ते आळंदीला आले. विठ्ठलपंत इंद्रायणीच्या काठी आले खरे पण आपल्या नेमधर्मा नुसार दररोज स्नान संध्याकरत आळंदीत रहात होते. हा तेजःपुंज अतिथी हा तेजस्वी पुरुष आहे तरी कोण? चेहऱ्यावर असलेली विद्वत्ता व शुध्द पवित्र आचरण पाहून आळंदीचे रहिवासी असलेल्या श्री,सिध्देश्वर कुलकर्णी यांच्या नजरेतुन हा योगीपुरूष सुटला नाही.

**(क्रमशः)**




## दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

ज्योतिर्मय साहित्य

दातदुखीपासून लगेच आराम हवा असेल तर पेरूची पानं चावावीत अथवा पेरूची झाडाची पानं पाण्यात उकळून त्या पाण्याने चूळ भरावी. यामुळे तुमची दातदुखी तर बंद होतेच पण त्याचबरोबर हिरड्यांमधील सूज आणि त्रासदेखील बंद होतो.

तुमच्या दातामध्ये दुखत असल्यास, त्या ठिकाणी कच्च्या कांद्याचा तुकडा ठेवावा. त्यामुळे पटकन दातदुखी बंद होते.. आंबट पदार्थ खाल्ल्याने होणा-या कळा थांबतात. दात दुखणे कमी होते.

दातदुखीसाठी हिंगाचा वापर अतिशय फायदेशीर ठरतो. त्यासाठी तुम्ही एक ग्लास पाणी घ्या. त्यामध्ये दोन चिमूटभर हिंग आणि एक चिमूटभर सैंधव घालून उकळून घ्या. पाणी कोमट झाल्यानंतर या पाण्याने तुम्ही चूळ भरा. त्यामुळे लगेच दातदुखी बंद होईल.

दाताला कीड लागली असेल आणि त्यामुळे तुमचे दात दुखत असतील तर दोन चिमूट सैंधवमध्ये तिळाचं तेल घालून ही पेस्ट कीड लागलेल्या दाताला लावा. असं केल्यास, तुमच्या कीड लागलेल्या दातातील वेदना थांबतील.

दातदुखीसाठी लसूनदेखील एक चांगला उपाय आहे. लसणाची एक पाकळी दाताखाली दाबून ठेवावी. काही वेळातच दातामध्ये येणारे वेग कमी होतील.

प्रत्येकाच्या घरात बटाटे तर असतातच. तुमच्या दातांमध्ये दुखत असल्यास आणि सूज आली असल्यास, बटाटा कापून त्याचे स्लाईस करून त्या भागावर साधारण २० मिनिट्स ठेवा. लगेचच दुखणं बंद होईल.

दातदुखीपासून सुटका होण्यासाठी तुम्ही टी - बॅगचादेखील वापर करू शकता. गरम पाण्यात टी बॅग्ज ठेवा आणि तुमच्या दातदुखीच्या ठिकाणी शेका. यामुळे दुखणे कमी होईल.

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

**(क्रमशः)**



## लघु बोधकथा

♦ परतफेड ♦

*सरु गाय गवत खात होती. तिचं लक्ष समोरच असलेल्या सापाकडे होतं. तो साप निपचीत पडला होता. तेव्हा त्याला भयंकर वेदना वाटत होत्या. तो कशानं तरी घायाळ झाला होता. सरु गाईनं त्याला पाहिलं व न घाबरता त्याच्या जखमा चाटल्या. ज्या जखमा तिच्या चाटण्यानं बऱ्या झाल्या होत्या. सरु आज म्हातारी झाली होती व तिच्या मालकानं तिला कसायाला विकलं होतं. तो तिला कापायला नेत होता. आज सापानं तिला पाहिलं. ओळखलं व त्यानं कसायाला दंश केला. ज्यात कसाई मरण पावला व गाईची सुटका झाली.*

*बोध- माणसांपेक्षा केलेल्या उपकाराची जाणीव प्राणी ठेवत असतात.*

# 'बाई अडलीयेम्हणूनच ती नडलीये!'
## टॅगलाईन जीवंत करणारा 'आशा'चा ट्रेलर प्रदर्शित



महिलांच्या संघर्षांचा, त्यांच्या जिद्दीचा आणि समाजाशी सुरू असलेल्या लढ्यांचा संवेदनशील आणि वास्तववादी प्रवास 'आशा'मधून उलगडत जातो. ट्रेलरमध्ये रिंकू राजगुरूने साकारलेल्या आशाचे अनेक पैलू दिसतात. गावोगावी लोकांच्या आरोग्याची जबाबदारी पेलणे, कुटुंबातील ताणतणावांना सामोरं जाणं, अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहाणं आणि स्वतःचं ध्येय साध्य करण्याची न थकणारी धडपड. तिच्या आयुष्यातील धग, वेदना आणि तळमळ ट्रेलरमध्ये स्पष्टपणे जाणवते.

रिंकूसह सायंकित कामत, उषा नाईक, शुभांगी भुजबळ, सुहास शिरसाट, दिशा दानडे, दिलीप घारे आणि हर्षा गुप्ते यांच्या भूमिका चित्रपटाला अधिक मजबुती देतात.

सामाजिक वास्तव, महिलांवर येणारे अनेक कठोर निर्णय, भावनिक दडपण आणि अस्मितेची लढाई या सगळ्यांचा प्रभावी संगम चित्रपटात दिसणार आहे. 'आशा' ही केवळ एका सेविकेची कथा नाही, तर सर्व स्तरांवर दररोज लढणाऱ्या लाखो महिलांची कहाणी आहे, हेच चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरते.

दिग्दर्शक दिपक पाटील म्हणतात, "'आशा' हा केवळ एका आरोग्य सेविकेचा प्रवास नाही. ती त्या लाखो स्त्रियांची प्रतिनिधी आहे, ज्या आयुष्यभर इतरांसाठी झिजतात, स्वतःच्या भीतींवर मात करतात आणि कुठल्याही परिस्थितीत हार मानत नाहीत. या चित्रपटातून आम्ही त्या अनामिक योद्ध्यांना प्रकाशात आणू इच्छितो. तिचं सत्य, तिचा वेदनादायी तरीही प्रेरणादायी प्रवास आम्ही प्रामाणिकपणे मांडला आहे."

दिपक पाटील दिग्दर्शित 'आशा'चे कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, निलेश कुवर, दैवता पाटील आणि दिपक पाटील निर्माते आहेत. तर मुरलीधर चटवानी आणि रवींद्र औटी सहनिर्माते आहेत. पॅनोरमा स्टुडिओजच्या माध्यमातून प्रदर्शित होणारा हा चित्रपट नाविन्यपूर्ण कथानक आणि वास्तववादी मांडणी घेऊन भेटीला येत आहे.

'आशा' हा चित्रपट येत्या १९ डिसेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, टीझर, गाणं आणि ट्रेलरमुळे आधीच निर्माण झालेली उत्सुकता पाहता, हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक प्रभावी आणि भावस्पर्शी अनुभव ठरणार आहे, हे नक्की.

**ज्योतिर्मय साहित्य**

काही दिवसांपूर्वी 'आशा' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आणि चित्रपटाच्या 'बाई अडलीयेम्हणूनच ती नडलीये' या प्रभावी टॅगलाईनमुळे टीझरने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली. त्यात रिंकू राजगुरू साकारत असलेली आशा सेविका सायकलवर बसून गावागावांतील लोकांपर्यंत पोहोचते, अशी काही झलक दाखवण्यात आली होती. या साध्या तरीही परिणामकारक दृश्यांनीच प्रेक्षकांच्या मनात आशाच्या प्रवासाबद्दल एक वेगळं कुतूहल निर्माण केलं.

याच उत्सुकतेला आणखी उधाण आलं ते, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'चालत रहा पुढे' या प्रेरणादायी गाण्यामुळे. आशाच्या संघर्षाला ऊर्जा देणाऱ्या या गाण्याला सोशल मीडियावर मोठा प्रतिसाद मिळत असून, अनेकांनी आशाच्या जिद्दीची आणि धैर्याची स्तुती केली आहे आणि आता प्रदर्शित झालेला दमदार ट्रेलर ही उत्सुकता आणखीनच वाढवणारा ठरत आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, ज्येष्ठ साहित्यिक आणि ९९व्या आखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील आणि लोढा फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजू मंगलप्रभात लोढा

आदी मान्यवरांसह 'आशा' सेविका यांच्या उपस्थितीत पार पडला.

# जैन तीर्थ संरक्षणी महासभेच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यपदी महावीर सेठी



**ज्योतिर्मय साहित्य**

**बीड** – श्री भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थ संरक्षणी महासभेच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य पदासाठी महावीरजी माणिकचंदजी सेठी यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजक पी. यू. जैन विद्यालयाचे अध्यक्ष तसेच महावीर इंटरनॅशनल जैन संस्थेचे उपाध्यक्ष, जैन इंजिनियरिंग सोसायटी छत्रपती संभाजीनगरचे पॅटर्न मेंबर तसेच बीड शहरातील श्री १००८ वासुपूज्य स्वामी दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महावीर माणिकचंदजी सेठी यांच्या नुकत्याच झालेल्या कार्यकौशल्याच्या आणि समाजकार्याच्या योगदानाची दखल घेऊन ही निवड करण्यात आली.

त्यांच्या महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष वर्धमानजी पांडे, महामंत्री महावीरजी ठोले यांच्या वतीने तसेच दैनिक लोकाशा संपादक विजयराजसिंह बंब, डॉ. महावीरजी बडजाते, नरेंद्रजी महाजन, आशिषजी जैन, अखिल भारतीय दिगंबर जैन संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष वर्धमानजी पत्रलालजी जैन नाकेल, अतिनजी डोंगाकर, धन्यकुमारजी ढोणे, विजयभारतजी कोडेकर, पद्माजी हिरामनजी आंबेकर, चंद्रकांतजी खंडके, जुगलकिशोरजी कन्हैयालालजी जैन, रविंद्रजी पोरवाल, भारतजी देशमाने, संजयजी गोपलकर, शांतिनाथजी गोपलकर, ॲड. महावीरजी पहाडया तसेच सकल जैन समाज बीड व सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर यांच्यातर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.







# श्री पद्मनाभ स्वामी मंदिर तिरुव अनंत पुरम

**ज्योतिर्मय साहित्य**

मंदिर संपत्ती

पद्मनाभ मंदिराचा विस्तार सोळाव्या सतराव्या शतकात पूर्ण झाला. त्याकाळी असलेले त्रावणकोर संस्थानाचे राजे मार्तंड वर्मा हे अतिशय पराक्रमी राजे होते. याशिवाय ते विष्णूचे अनन्य भक्तही होते. त्यांनी अनेक लढाया करू सर्वत्र विजय संपादन केला व आपल्या राज्याचा विस्तार केला. हे यश केवळ प्रभू मुळेच आले आहे, असा भाव त्यांच्या मनात दृढ झाला. त्यांची भक्ती उत्तरोत्तर वाढायला लागली. त्यांनी एकदा असा निश्चय केला की, हे राज्य, हे वैभव, ही संपत्ती, सारं काही भगवंताचे आहे. आणि आपण केवळ त्याचे दास आहोत. या भावनेने त्यांनी आपले संपूर्ण राज्य भगवंताच्या नावावर चालविण्यास सुरुवात केली. लढाईतून किंवा कर रूपाने आलेले सारे धन ते मंदिरास अर्पण करू लागले. त्यानंतर त्यांच्या १३ पिढ्यापर्यंत प्रत्येकाने हाच वारसा चालविला. यामुळे मंदिराजवळ अगणीत संपत्ती जमा झाली.



या मंदिराच्या तळ घरात सात लादण्या आहेत. त्यातील सहा लादण्या सरकारतर्फे उघडण्यात आल्या व त्यात हजारो किलो सोन्याच्या मुर्त्या, दागिने इत्यादी सापडले. याशिवाय माणिक, मोती,जडजवाहीर असे अगणित धन असल्याची नोंद झाली. इथेच पद्मनाभाची शेकडो किलो वजनाच्या सोन्याची मूर्ती आढळून आली आहे. इथे आश्चर्याची गोष्ट अशी की ज्या वर्मा राज घराण्याने आपली संपत्ती मंदिराच्या नावावर केली, त्या घराण्यातील आजचे विद्यमान वंशज यांनी कुणीही त्यातील एक छदामावर ही आपला हक्क सांगितला नाही.

सातव्या दरवाजाचे रहस्य

मंदिराच्या तळघरात असलेल्या सात लादण्यांना क्रमाने ए बी सी डी इ एफ जी अशी नावे देण्यात आलेली आहे यातील बी लादणी वगळता इतर सहा लागण्या सरकारच्या नियंत्रणाखाली २०११ साली उघडण्यात आल्या. बी लादणी मात्र उघडण्यात आली नाही. या लादणीचे दार हे लोखंडाचे असून त्यावर नागांच्या प्रतिमा आहेत. या दाराला कडी कोंडा किंवा कुलूपही नाही. असे समजण्यात येते की मंदिराच्या धनाच्या संरक्षणार्थ या लादणीचे दार नागपाशाने बंद करण्यात आलेले आहे. व ते उगढायचे असल्यास गरुड मंत्राचा जप करणारा कोणी सिद्ध पुरुष असेल तरच हे दार उघडता येईल. अन्यथा उघडणारा मृत्युमुखी पडेल. अशी धारणा येथे आहे. हे दार समुद्राकडे उघडल्या जाते.चूक पद्धतीने दार उघडल्यास समुद्राचे पाणी आत घुसून संपूर्ण मंदिर पाण्यात बुडेल. आणि उघडणार्याचा विनाश होईल. अशी भावना येथे आहे १९०८ व १९३१ साली काही इंग्रज अधिकाऱ्यांनी हे दार उघडण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यावेळेस अचानक हजारो नाग तिथे निर्माण झाले व इंग्रजांची पळता भुई थोडी झाली. त्यामुळे ही लादणी उघडण्यात आलेली नाही. **(क्रमशः)**

# प्राकृतिक आणि प्रासादिक बुद्धिमत्तेचे वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

या साधनेचे विशेष महत्त्व असे की दंडक्रम पारायण ही केवळ धार्मिक कर्मकांडे नसून वेदाध्ययनाचा उच्चतम टप्पा मानला जातो. वेदांचे स्वर कसे जपले गेले, हजारो वर्षांची मौखिक परंपरा का टिकून राहिली, आणि उच्चारशुद्धतेचा वेदांच्या अर्थाशी काय संबंध आहेया सर्व प्रश्नांची उत्तरे या साधनेत दडलेली असतात. देवव्रत यांची ही सिद्धी त्यामुळे केवळ वैयक्तिक विजय नाही, तर भारतीय ज्ञानपरंपरेच्या सातत्याचे प्रतीक आहे.



वाराणसीतील साङ्गवेद विद्यालयात तपोमूर्ती द्रविड शास्त्रींच्या पावन आणि कृपामय उपस्थितीत दण्डक्रम पारायण संपन्न झाले, याचे महत्त्व अपरंपार आहे. यावेळी पाराथण श्रोते म्हणून वेदमूर्ती श्री देवेंद्र गढीकर उपस्थित होते.

या पारायणाची माहिती प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक राष्ट्रीय वृत्तमाध्यमांनी त्याची दखल घेतली. काही दिवसांतच सोशल मीडियावर त्यांच्या अभ्यासाचे व्हिडिओ, अनुभव, आणि अभिनंदनपर संदेशांची बरसात होते आहे. पंतप्रधानांसह अनेक नामांकित व्यक्तींनी देवव्रत यांच्या साधनेचे कौतुक केले आणि वेदविद्येचे पुनरुज्जीवन घडवणाऱ्या या तरुणाची प्रशंसा केली. यामुळे त्यांचे कार्य राहता राष्ट्रीय जागृतीचा भाग ठरले.


विद्यावाचस्पती
चन्द्रहास दुर्गादासशास्त्री सोनपेठकर

वेदमूर्ती देवव्रत यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची विनम्रता आणि अभ्यासू वृत्ती. मुलाखतींमध्येही त्यांनी आपल्या साधनेचे श्रेय नेहमी गुरुजनांना, कुटुंबाला आणि परंपरेला दिले. आजच्या काळात यश मिळाल्यावर त्याचे प्रदर्शन करणे सहज शक्य असते; परंतु देवव्रत यांनी प्रसंगानुरूप संयम आणि सुसंस्कृत आचरण दाखवले. वेदांतील सत्य, शुचिता, संयम आणि कृतज्ञता हे मूल्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतात. अनेक युवकांसाठी ते आज प्रेरणास्थान बनले आहेत.

या साधनेचे व्यापक सामाजिक महत्त्वही मोठे आहे. देशात वेदाध्ययन करणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी होत असताना, एखादा तरुण एवढ्या प्राणप्रतिष्ठापूर्वक परंपरेचे पालन करतो, हे नव्या पिढीला वेदांविषयी कुतूहल निर्माण करणारे आहे. काही महाविद्यालयांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये वेदांचे वैज्ञानिक स्वरूप, ध्वनिशास्त्र, न्यूरोसायन्सवर होणारा परिणाम आणि स्मरणशक्तीचा विकास या विषयांवर चर्चा सुरू झाली आहे. वेदांचे स्वर हे साउंड इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटेशनल स्ट्रक्चर्सशी साम्य राखतात, यावरही संशोधन चर्चिले जात आहे. देवव्रत यांच्या साधनेमुळे या चर्चांना नवीन आधार मिळाला आहे.

त्यांच्या या पराक्रमातून एक महत्त्वाचा संदेश मिळतोकी भारतीय ज्ञानपरंपरा पुन्हा नव्या पिढीच्या हातात फुलू शकते, जर मार्ग दाखवणारे आणि आदर्श घडवणारे तरुण पुढे आले तर. यातून वेदपाठशाळांना, वेदाध्ययन संस्थांना आणि संस्कृत विद्यापीठांना एक नवी ऊर्जा मिळेल. अनेक पालक स्वतःहून विचारतात की मुलांनी वेद किंवा संस्कृत शिकावे का, आणि कसे शिकावे? हा बदल आशादायक आहे, कारण परंपरा फक्त संस्थांनीच नव्हे, तर घराघरांतून जिवंत राहतात.

वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांनी केवळ एक पारंपरिक साधना पूर्ण केली नाही; त्यांनी भारतीय संस्कृतीतील एक गाढ दुवा पुन्हा जिवंत केला आहे. आजच्या प्रगत तंत्रयुगातही वेदांचे महत्त्व, त्यांची वैज्ञानिकता आणि त्यांचा आध्यात्मिक आधार किती भक्कम आहे हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांनी केवळ परंपरेला गौरव मिळवून दिला नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी एक तेजस्वी मार्गही उजळून टाकला आहे.












# स्वातंत्र्यलढ्यातील अध्वर्यु बॅरिस्टर अत्तावार यल्लप्पा

**ज्योतिर्मय साहित्य**

आझाद हिंद बँकेची स्थापना करणारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून काम करणारे बॅरिस्टर अत्तावार यल्लप्पा हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महत्वाचे अध्वर्यु होते. ४ मे १९१२ रोजी जन्मलेले यलप्पा–आझाद हिंद सरकार व इंडियन नॅशनल आर्मी यांच्याशी जोडलेले कायदेतज्ञ, आयोजक आणि अर्थव्यवस्थापनकर्ते होते. आझाद हिंद बँकेचा उद्देश भारतीय स्वातंत्र्यासाठी संपत्ती (धन) गोळा करणे हा होता. नेताजी यांचे जवळचे असलेले यल्लप्पा आझाद हिंद सरकारच्या प्रमुख सल्लागारापैकी एक होते. आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद सेनेची स्थापना करताना आर्थिक, कायदेशीर आणि संघटनात्मक बाबतीत यल्लप्पा यांचे योगदान हे संस्मरणीय असे आहे. बँक स्थापनेत आणि आर्थिक व्यवहारात आझाद हिंद सरकारचे उद्दिष्ट सामावलेले असल्याने यलप्पा यांना राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे विश्वासु सहकारी म्हणून मान्यता प्राप्त झाली. अत्तावार यल्लप्पा मूळ दक्षिण भारतातील कुटुंबातून आलेले इंग्रजी कायद्याचे उच्च शिक्षण घेतलेले बॅरिस्टर होते. व्दितीय महायुद्धाच्या आधी ते मलाया / सिंगापूर येथे एका इंग्रज सॉलिसिटर फर्म मध्ये काम करणारे यशस्वी कायदेतज्ञ आणि आर्थिक– सामाजिकदृष्या प्रभावशाली भारतीय म्हणून ओळखले जात. सुरवातीला यल्लप्पा यांना सक्रीय राजकारणात विशेष रस नव्हता, तसेच त्यांना जपानी सत्तेबद्दल संशय आणि नाराजी होती. पण ९ जुलै १९४३ रोजी सिंगापूरच्या समुद्रकिना–यावर असलेल्या पंडागवर येथे ६०,००० भारतीय आणि भारतीय वंशाच्या लोकांच्या प्रचंड मोठ्या दमदार मेळाव्यासमोर नेताजींनी भारताच्या अखेरच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी संपूर्ण एकतेची हाक दिली. या एकतेच्या कल्पनेत पुरुषांच्या जोडीने संघर्षाच्या सर्व भूमिकांमध्ये स्त्रीयांचाही सहभाग अपेक्षित असून झाशीच्या राणी पलटणीच्या त्यांच्या योजनेवर विशेष भर नेताजींनी दिला होता. याठिकाणीच नेताजींनी हेरलेला हीरा म्हणजे अत्तावार यल्लप्पा.

आग्नेय आशियातल्या जपानी अधिपत्याखाली आलेल्या देशांमध्ये इंडियन इंडिपेंडन्स लीग च्या सक्रीय शाखा होत्या. विशेषतः मलाला आणि सिंगापूर इथं त्या अधिकच ताकदवान होत्या. २ जुलै १९४३ रोजी नेताजी सिंगापूरमध्ये आले आणि ४ जुलै त्यांनी रासबिहारी बोस यांच्याकडून पूर्व आणि आग्नेय आशियातल्या इंडियन इंडिपेंडन्स लीगच नेतृत्व स्वीकारलं. ५ जुलैला नेताजींनी आझाद हिंद सेनेच्या १५००० सैनिकांच्या अत्यंत प्रभावी पद्धतीनं आयोजित केलेल्या समुद्रकिना–यावर असलेल्या पडांगवर येथील संचलनाची पाहणी केली. झाशीची राणी पलटणीची उभारणी करण्यात लक्ष्मी यांना अत्तावार यल्लप्पा या सिंगापूरमधल्या इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या तरुण अध्यक्षांची पुष्कळच मदत झाली.



कर्नाटकमधल्या किनारपट्टीच्या भागात मंगलोर प्रांतातल्या एका गावात जन्मलेले बॅरीस्टर अत्तावार यल्लप्पा हे उत्कृष्ट संघटक होते. १९४३ ते १९४५ या काळात नेताजींच्या नेतृत्वाखाली असलेल्या आझाद हिंद चळवळीचे ते आधारस्तंभ होते. या चळवळीसाठी निधी गोळा करण्यात त्यांचा विशेष हातखंडा होता. त्यांचे व्यावसायिक नेटवर्क विशेषतः स्थानिक चेट्टियार आणि इतर व्यापा–यांमध्ये मजबूत होते. याच नेटवर्कचा वापर त्यांनी आझाद हिंद बँकेसाठी भांडवल उभारण्यासाठी केला.बँकेची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी अत्तावार यांचेकडे नेतृत्व सोपविण्यात आले. १९४३ मध्ये आझाद हिंद सरकार स्थापन झाल्यानंतर सरकारकडे जमा होणारा देणगी निधी, आयएनए चे वेतन, रसद व युध्दखर्च व्यवस्थित हाताळण्यासाठी स्वतंत्र बँकेची गरज तीव्र झाली.

नेताजी यांची स्पष्ट भूमिका होती कि, आझाद हिंद सरकारकडे स्वतःची बँक आणि स्वतःची चलनव्यवस्था असली पाहिजे कि, ज्यामुळे त्यातून आर्थिक स्वावलंबनाचा संदेश जाईल. एस.ए. अय्यर यांनी लिहून ठेवले आहे कि, एका आठवड्यात रंगूनमध्ये जमाल रोड जवळ आयएनए मुख्यालयाच्या शेजारी रिकाम्या इमारतीला पूर्ण बँकेत रुपांतर करण्याचे काम यल्लप्पा आणि चार इतर देशभक्तांनी केले. एप्रिल १९४४ मध्ये रंगून येथे आझाद हिंद बँक औपचारिकपणे सुरू झाली जी, आझाद हिंद सरकारची कोषागार व आयएनए ची ‘‘फायनान्सिंग आर्म‘‘ म्हणून कार्यरत होती. यासाठी प्रारंभी अधिकृत भांडवल ५० लाख रुपये ठेवण्यात आले. पूर्ण बँकिंग सुविधासह शाखा उभी करण्यात यल्लपाने प्रमुख भूमिका बजावली. रंगूनमधील अब्दुल हानी यांनी जी मोठी देणगी आणि मालमत्ता आझाद हिंद सरकारला दान केली त्याचा उपयोग




बँकेच्या भांडवलासाठी आणि आयएनए च्या खर्चासाठी करण्यात आला. काही श्रीमंत उद्योजकांनी जवळजवळ आपला संपूर्ण व्यवसाय आयएनए उभी करण्यासाठी वापरला. आग्नेय आशियातील स्थानिक व्यापारी, चेट्टियार बँकर्स, प्लान्टेशन कामगार, दुकानदार आणि इतर भारतीयांनी आझाद हिंद सरकारसाठी उदारतेने देणग्या दिल्या. या सर्वांच्या सहभागामुळे आझाद हिंद बँकेचे एकूण संसाधन कोट्यवधी रुपयांवर गेले तसेच काही अंदाजांप्रमाणे २० कोटी रुपयाहून अधिकची रक्कम वॉर फंड साठी वापरण्यात आली. आझाद हिंद बँकेचे जे उद्दिष्ट सरकारसाठी निधी जमा करणे, आयएनए च्या सैनिकांचे वेतन, रसद, शस्त्रसामग्री, प्रचार व पुनर्वसन यासाठी वापरणे होते ते सफल करण्यात यल्लप्पा यांच्या नेतृत्वाखाली शक्य झाले. या बँकेने दुस–या महायुद्ध काळात भारतीय समाजासाठी वित्तीय सेवा दिल्या. सरकारचे सर्व निधीही या बँकेत ठेऊनच त्याचा विनियोग होत असे. बँकेने आझाद हिंद सरकारच्या नावाने स्वतःच्या चलनविषयक प्रॉमिसरी नोटस जारी केल्या ज्या, आयएनए नियंत्रीत क्षेत्रात तसेच जपान नियंत्रित काही भागात विनिमय माध्यम म्हणून वापरल्या जात.

(क्रमशः)

# अतिउच्चीचा बुद्ध्यांक सामान्य जीवन जगण्यासाठी खूप कठीण

**ज्योतिर्मय साहित्य**

सामान्य माणूस आनंदाने जीवन जगू शकतो, रोजच्या जीवनातल्या समस्या सहजपणे सोडवू शकतो. जेव्हा माणसाच्या महत्त्वाकांक्षा वाढतात तेव्हा त्याचे जगण्याचे उद्दिष्ट वेगळे असते, त्याची भरारी जरी उंच असली तरी ती घेताना ज्या जमिनीवर त्याने पाय ठेवलेले असतात, ती जमिनी खाली जाते की, काय अशी परिस्थिती निर्माण होते.

जो मनुष्य पूर्ण ताकदीने हे सर्व पेलू शकतो, तोच आपली गरुड भरारी घेऊन गगनाला गवसणी घालू शकतो. तो जरी असामान्य असला तरी सामान्य माणसांच्या नजरेत तो मूर्ख, वेडसर, भोळसट सुद्धा समजला जातो. काही लोकांकडे अफाट बुद्धिमत्ता असते, पण समोरच्या माणसाला ती ओळखता आली नाही तर त्या बुद्धिमत्तेचे काही च मोल रहात नाही.

यावरुन असे लक्षात येते तेथे पाहिजे जातीचे म्हणजे त्या त्या क्षेत्रातील लोकानांच त्या गुणांचे कौतुक असते, अर्थ समजतो.



एक अगदी जवळचे उदा. म्हणजे आमच्या ओळखीचे एक सद्गृहस्थ होते, ते आता अस्तित्वात नाहीत. त्यांच्याकडे अफाट बुद्धिमत्ता होती, संस्कृत भाषेचे पांडित्य ज्ञान त्यांच्या जवळ होते, मुलेबाळे, पत्नी, नातवंडे सारे होते, पण त्यांची तत्वे एवढी परखड होती की, त्यांना कंटाळून मुले पत्नी दुसरीकडे रहायला गेली.

त्यांना एकट्याना सोडून, सरतेशेवटी वृद्धावस्थेत ते एकटे पडले, कालांतराने अचानक मृत्यू आला, नशीबाने घराचा दरवाजा उघडाच होता, समोरच्या बिर्हाडातील व्यक्तीला ते बेडवर अर्धवट ओणवे पडलेले दिसले, त्याने चौकशीसाठी दरवाजाची बेल मारली, ते काका उठले नाहीत म्हणून ते दार ढकलून आत आले, हाक मारली, हलवले तेव्हा कळले की, ते हयात नाहीत. नंतर एकमेकांना फोन, डॉक्टर वगैरे बोलावणे झाले, पण डॉक्टर आले नाहीत. मग ओळखले एक डॉ. आले शहानिशा झाली, ते जिवित नाहीत हे कळले, नंतर खूप सर्व च गोष्टी घरातल्यांनाही त्रासदायक ठरल्या. खूप दिवस म्हणजे वर्ष दीड वर्ष तरी सर्व सोपस्कार चालू होते.

खूप वाईट वाटले, सर्व जण खूप हळहळले. नंतर सर्व जण त्यांच्या बुद्धिमत्तेची तारीफ करत होते पण काय उपयोग एक बुद्धीजीवी जीव अचानक अवकाशात विलिन झाला. वेळीच त्यांच्या ज्ञानाची दाद घेतली गेली असती तर सर्वांना त्यांच्या जिवंतपणाचे कौतुक, समाधान मिळाले असते, त्यांची गुणवत्ता सामान्य माणसांपेक्षा तग धरुन शकली नाही. शेवटी प्रत्येक गोष्टी ला समर्पक वातावरण लाभले नाही तर अशीच अवस्था होते.



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

खरे म्हणजे यातले काहीच लिहायचे नव्हते, वाचता वाचता एक लेख डोळ्यासमोर आला, आणि शब्द उमटत गेले.

# वाचत रहा

**ज्योतिर्मय साहित्य**

समाजात अनेक प्रकारचे प्राणी आहेत. त्या प्रत्येक प्राण्याला जाणीव आहे. आणि जिथे जाणीव असते तिथे बुद्धीचा अंश असतो. सगळ्यांना जाणीव असते पण फक्त मनुष्य प्राण्याला किंवा मानवी जीवन जगत असताना बुध्दीचा खरा विलास दृष्टीस पडतो. माणसाच्या बुध्दीला विवेकाचे स्वरूप येते. विवेकामध्ये सारासार विचार असतो. विवेकाने शाश्वत काय आणि अशाश्वत काय? यांचा निवाडा करायची बुध्दी होते. मनाची चंचल अवस्था रहात नाही. धरसोड वृत्तीला पायबंद बसतो. सत्य असत्याचा भेद स्पष्टपणे दिसून येतो.



मनाची प्रगल्भता वाढते. असार टाकून द्यावे सार फक्त ओरपावे. अशी मानवी मनाची अवस्था वाचनाने साहित्याने होते. अशाश्वताचा अव्हेर करून फक्त शाश्वतता स्विकारावी. असत्याचा त्याग व सत्याची कास कधीच सोडून नये. भले त्यासाठी नमतं घेतलं तरी हरकत नाही कुरघोड्या करत उचापती करत वेळ दवडू नये. स्वच्छ बुध्दी ही फार मोठी दैवी शक्ती असते. विवेकशक्तिच्या या प्रबल प्रेरणेतून मानवी जीवनांत प्रगल्भ बुध्दी अंगी असावी अशी विविध ध्येये,मूल्ये आदर्श, चांगल्या लेखकांच्या कल्पना, नाना प्रकारच्या कला की त्या कलेमुळे आपले जीवन समृद्ध देशासाठी समर्पित होईल. विवेकाने संस्कार संयम वाढतो. विवेकाच्या जोरावर अंतःकरण विशाल बनते तेव्हा लेखन, वक्तृत्व वाढते तेव्हा शास्त्रे निर्माण होतात. शास्त्रांचा उपयोग मानवी जीवन सुखकर होण्यासाठी होतो हे आपण आज हरघडी अनुभव घेत आहे. मानवी जीवनात यशस्वी होणे आणि तेही कोणतेही मूल्ये पायदळी न तुडवता ! कल्याणमय, मंगलमय, ज्ञानमय, विज्ञानमय आणि आनंदमय ह्या ध्येयाचा ध्यास तुमचा सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. त्यासाठी सतत संत चरित्रे वाचा.

त्याच बरोबर वाचन संस्कृती जोपासा. बुध्दी सगळ्यांना चांगलीच मिळेल असं नाही. पण आपल्या बुध्दीचा वापर आपण कसा करायचा म्हणजे चांगल्या वर्तनाने जगायचे की दुष्कर्म करून दुर्मिळ मनुष्य देहाचे वाटोळे करून घ्यायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. रामायण, महाभारतातील गद्य पद्य वेचे, ही साहित्य संपदा प्रत्येकाचं जीवन सुखकर होण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. हा तर मार्गशीर्ष महिना आहे.आता तर गुरूचरित्र वाचण्यासाठी अनेक भक्त आपले योगदान देत आहेत. त्यांनतर, रामायणातील सुंदरकांड, युध्दकांड अशी न मोजता येणारी अगणीत साहित्य संपदा आज तुमच्या माझ्यासमोर हात जोडून उभी आहेत आपण फक्त ते वाचायला शिकलं पाहिजे. ज्ञानेश्वरी, गजानना महाराज समर्थांचा दासबोध,करूणाष्टके, मनाचे श्लोक, कितीही वाचली तरी ती कमी आहेत. साहित्य मग ते कोणत्याही स्वरूपात उपलब्ध असेल ते ते सतत वाचत राहिले तर आपला स्वतः चा तर विकास होईल त्या बरोबर प्रत्येक व्यक्तीला परमश्रेष्ठ जीवनध्येय म्हणजे काय हे समजेल. म्हणून वेगवेगळ्या साहित्याचा सतत रसास्वाद घेतला पाहिजे. अज्ञान, दुःख व भ्रांति नाश पावून त्याला विवेकाची जोड मिळाली तर देहबुध्दीचे धोके कमी होतील,आज समाजात पैसा हा सर्वश्रेष्ठ मानला गेला आहे. तो जीवनातील गरजा पूर्ण होईपर्यंत हवा ?हे सर्व मान्य तत्व ध्यानी धरावे.. अति लोभाने ध्येयवादाला तिलांजली दिली जाते व रहातो तो फक्त भोगवाद--!!! गाडी,बंगला, कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी,!!!याला कुठल्याही प्रकारचे संयम माहीत नाही. पण!!! पण चंगळवाद कधी थांबायचे नावचं घेत नाही हो!! त्यामुळे कितीही असले तरी समाधान नाही. त्यासाठी एक नेहमी लक्षात ठेवा एक दिवस हे सगळं ईथेचं सोडून जायचं आहे. त्या दिवसाची आठवण ठेवत सद्विचारासाठी सतत संत साहित्य आध्यात्मिक वृत्ती जोपासली तर साहित्य हा समाजाचा खराखुरा आरसा आहे असे म्हणायला अभिमान वाटेल.



सौ उज्वला धर्माधिकारी

# आनंदाचे जीवन गीत

**ज्योतिर्मय साहित्य**

आपलं मानवी जीवन विलक्षण सुंदर आहे आणि आपलं मानवी मन एक विलक्षण कोडं आहे. हे जीवन सुखी ठेवण्यासाठी आपल्याला देवाने जे मन दिले आहे, ते अत्यंत आनंदी असणं अत्यंत गरजेचे आहे.

आनंद म्हणजे खरं तर चेतनेची उच्च अवस्था प्राप्त होणे होय. प्रत्येक जीवा मधे आनंद असतोच पण मानव नावाचा प्राणी त्याचा हवा तेंव्हा, हवा तसा अनुभव घेऊ शकतो.

आनंदी राहण्यासाठी आपण आपलं अपेक्षांचं ओझे कमी केले पाहिजे. घर दार, पैसा, गाडी, बंगला म्हणजे खरं सुख का? तर याचे उत्तर देणे आपल्याला संदिग्ध करू शकते. ही सारी भौतिक सुखे आहेत. काही काळ, काही दिवस, काही वेळ ही सुखे मनाला आनंद देऊ शकतील पण कायमचे कधीच नाही .

जगात असे किती तरी लोक आहेत त्यांच्याकडे खूप प्रचंड संपत्ती आहे पण ते प्रत्येक जन सुखी असेलच याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही.

खरं तर सर्वात मोठी संपत्ती म्हणजे आपले संपन्न आरोग्य होय. ज्याचे आरोग्य फिट असेल त्याच्या इतका सुखी कुणीच नसतो.नाही तर आजकाल काही अपवाद सोडता चाळिशी उलटली की अनेक प्रकारच्या व्याधी मागे लागलेल्या दिसतात आणि रोजच् गोळ्या औषधी घेणे गरजेचं होते.

आपल्याला चालायला दोन पाय आहेत. त्याचा उपयोग आपण नित्य केला पाहिजे. जवळ जाण्यासाठी गाड्यांचा वापर टाळला पाहिजेच.

एक उदाहरण म्हणून सांगतो, मी परभणी बीएसएनएल मधे लेखाधिकारी असताना,माझा एक मित्र सोबत असे. ती म्हणजे श्री अरुण कुलकर्णी ही व्यक्ती होय. नेहमी हसतमुख, प्रामाणिक इतरांस सदैव मदत करणारी अशीच. ही व्यक्ती ऑफिसला नेहमी पायीच येत असे. मी मात्र स्कूटरवर येत असे. रस्त्यात ते भेटले की मी त्यांना, माझ्या सोबत स्कूटरवर नेत असे .

एकदा असेच उन्हाळ्याचे दिवस होते. मी ऑफिसला निघालो. नेहमी प्रमाणे अरुणराव भेटले रस्त्यात, मी त्यांना स्कूटरवर येण्याची विनंती केली. ते मागे बसले, तेंव्हा मी अरुणरावांना विचारले, अरुणराव, तुम्हाला वाटत नाही का आपण रोज आपल्या गाडी वर यावे? पायी नको. आपण एक छान गाडी विकत घ्यावी.

योगायोगाने त्याच वेळी एक एका पायाने अधू व्यक्ती समोरून पायी चालली होती. त्याला पाहून अरुणराव मला म्हणाले, बघा वसेकर साहेब, तो बिचारा एवढ्या उन्हात लंगडत पायीच चालला आहे. चालण्यासाठी त्याला आपल्या पेक्षा जास्त ऊर्जा खर्च करावी लागते. त्या पेक्षा आपण आनंदी नाही का?

आपला भार आपल्या दोन्ही पायावर विभागल्या जातो. त्याला एका पायावर नक्कीच जास्त भार पडतो आणि मग तो पाय त्याला उशिराने वेदना ही देऊ शकतो. आणि कदाचित त्या वेदनांशी त्याने मैत्री केली असावी आणि एकदा असं अंगवळणी पडलं की त्याचा फारसा त्रास होत नसावा.

आपण मात्र आपल्या पायाचा वापर कमी करून जवळच्या ठिकाणी गाड्या वापरून आपल्याच शरीराला आळशी आणि पंगू करत आहोत. आणि गाड्यांच्या धुरा सोबत ध्वनी आणि वायू प्रदूषण आलेच

किती सहज सुंदर बोलले अरुणराव आणि मलाही जाणवले खरंच काय चूक आहे त्यात?

म्हणजेच अरुणरावांनी आनंद किती सहज शोधला होता. आता तर त्यांच्या वयाची साठी



झाली, सेवानिवृत्त झाले म्हणून त्यांनी पायी चालणे अजुन वाढविले आहे. किती सुंदर विचार हे.

ते म्हणाले, जेथे दूर खरच गरजेचे आहे तेथे मी मुलाच्या गाडीवर जात असतो पण फार कमी.

आणि हो ज्यांचे आरोग्य फिट व संपन्न असते, ते त्याच्या मनात सकारात्मकता वाढीसाठी पोषक असते आणि ती व्यक्ती उपजिविकेसाठी जे कार्य करत असते,त्यात त्याला प्रामाणिक कष्ट करून मनाला आनंद मिळतोच.

रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या शांत आणि छान झोप लागते.

आणि स्व.पु ल. देशपांडे सर नेहमी म्हणत, ज्याला अंथरुणावर पडल्या पडल्या झोप लागते, तो सर्वात श्रीमंत आणि सुखी प्राणी होय.

आणि आपण नेहमी जे कार्य




करतो, ते कार्य करतानाच आनंदी राहण्याची कला आत्मसात केली पाहिजे म्हणजे कार्य ही सुलभ होते, सहज होते,सुंदर होते आणि मग कार्यपूर्तीचा वेगळा आनंद ही मिळतोच. ज्याला हे रहस्य समजले त्याला जीवन समजले.

सांगायचे तात्पर्य काय? आनंद शोधला की सापडतो, समाधानात तर लवकर सापडतो आणि त्या आनंदात केलेले काम त्या कामात चांगले प्रावीण्य मिळवून देते आणि मग तर आनंदाची उधळण होते.

आपण जितके जास्त आनंदाच्या स्त्रोता जवळ जाऊ तितका, आनंद वाढत जातो. खरं तर आनंद मिळविण्यासाठी कोणतेही औषध नाही.आनंद हेच एक औषध आहे.

आयुष्य म्हणजे सुख दुःखाने विणलेला रुमाल असतो.जेंव्हा कधी नशीबी दुःख येतं, तेंव्हां म्हणावे की दुःख हे जाण्यासाठीच येतं आणि सुख आले की म्हणावे की सुख येणारच होतं.

भगवान श्रीकृष्ण एके ठिकाणी म्हणतात असे एक वाक्य आहे की आनंदी माणसाने ते वाचल्यावर तो माणूस दुःखी होईल व दुःखी माणसाने ते वाचल्यावर तो माणूस आनंदी होईल,तर हे वाक्य म्हणजे, ही ही वेळ जाईल. असे होय.

आपण सकारात्मक विचारांनी आपल्या जीवनाचा प्रवास केला तर तो नक्कीच आनंदी असतो. आणि दुसरे म्हणजे इतरांशी तुलना कधीच करू नये. त्यातल्या त्यात जास्त श्रीमंत, सुखी यांच्याशी कधीच तुलना करू नये. अशी

तुलना केली की आपल्या मनाला वाटते,माझ्याकडे हे नाही, ते नाही,म्हणजेच मन नकारात्मकतेकडे वळते आणि मग असलेल्या आनंदावर विरजण पडायला सुरुवात होते.

त्यामुळे अशी तुलना नेहमीच टाळली पाहिजे.

आपण कधीच भुतकाळाकडे वळू नये. कारण तो भूतकाळ आहे म्हणून नाही तर भूतकाळ हा मृतवत असतो.तो पुन्हा कधीच येऊ शकत नाही. मात्र भूतकाळातील काही चांगल्या आठवणी जपून ठेवलेल्या असल्या की त्या आठवून आपण आपल्या मनाला काही क्षण तरी सुगंधित करू शकतो, हे खरे आहे.

पण भूतकाळातील क्लेश दायक आठवणी कधीच आठवू नयेत.

आनंद हा कुठल्याही दुकानात विकत मिळत नाही .त्या करीता त्याचा शोध आपण आपल्या शांत चित्ताने, समाधानात लावून आपण आपलं जगणं उत्साही ठेवलं पाहिजे.

कधी ताणतणाव असला की हास्य त्यावर सुंदर उपाय आहे. कधी मन नाराज असले की स्व. पुल देशपांडे सरांची किंवा इतर कोणत्या विनोदी लेखकाची हलकी फुलकी विनोद वाचली पाहिजेत, ऐकली पाहिजेत. आणि जीवनी असं. वागण्याचा, असं जगण्याचा प्रयत्न केला की मग बघा, आनंदाच्या डोही आनंद तरंग,असच होतं आणि जीवन गीत आणखी सुरेल होतं. माझी स्वलिखित एक कविता आहे,जीवन गीत नावाची

ती पाठवून थांबतो येथे.

जीवनगीत

आनंद शोधावा आनंद लुटावा
आनंद वाटावा क्षणोक्षणी
जगण्याचा या उत्सव करावा
विसरून साऱ्या अडचणी
जीवनी जरी असे संघर्ष
कधी करू नये त्याचा बाऊ
काही प्रश्नांना उत्तर नसता
तेथेच ती सोडून देऊ
नव्या प्रश्नांना उत्तरे दयावी
असतात जी सहज सोपी
पुढची पाने उलटत जाता
अत्तराची सापडते कुपी
अवचित ती वेळ येते
सोडलेल्या प्रश्नांना मिळते उत्तर
आनंद होतो आपल्या मनाला
जेव्हा गुण मिळती शंभर
माणूस असे विद्यार्थी आयुष्यभर
सप्तसूर शिकत जावे
सूर लागो ना लागो कधी
जीवन गीत गात रहावे. ***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559